DAYANAND EDUCATION SOCIETY’S

# DAYANAND COLLEGE OF PHARMACY

BARSHI ROAD, LATUR.

## ACADEMIC YEAR
## 21-22

(१२ जुलै २०२१) :- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे घेण्यात आलेल्या बी.फार्म  २०१९-२०२० अंतिम वर्षाच्या परीक्षेत यशस्वी विद्यार्थीनींचा गुणगौरव सत्कार प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांच्या शुभ हस्ते विद्यापीठातून प्रथम येणारी केंद्रे प्रतिमा हिचा १०,००० ₹ तर विद्यापीठातून द्वितीय येणारी शीतल सोमाणी हिचा ७,००० ₹ चा धनादेश व पुष्पवृक्ष देवून सत्कार करण्यात आला.



( ९ ऑगस्ट २०२१ ) दयानंद शिक्षण संस्था,लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मधील डी.फार्म व बी.फार्म अंतिम वर्षाच्या २०२१ या बॅचच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ ऑनलाईन आयोजित केला होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून फार्मसी क्षेत्रातील सुप्रसीध्द लेखक व स्ट्रॅटिजिक फोरेस्टिक ग्रुपचे सिनियर प्रोग्रॅम ऍडव्हायजर सचिन इटकर तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री रमेशजी बियाणी, महाविदयालयाच्या प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती.



( १७ ऑगस्ट २०२१ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गतवृक्षारोपण शिबीर उत्साहात संपन्न झाले. या वृक्षारोपण शिबीराचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते व रा.से.यो.चे प्रमुख प्रा.वाघमारे आर. एस. यांच्या हस्ते झाले.यावेळी महाविद्यायातील प्रा.समीप सोनवणे, प्रा.रघुनाथ वडुळकर, प्रा.महेश बिराजदार,प्रा.अजय गडगुळ ,सांस्कृतिक वि.प्रमुख प्रा.गोपाल लोहिया, प्रा.रोहित सारडा, प्रा.महेश मानके, प्रा.नरेश हलके, प्रा.राहुल हुडे,प्रा.योगेश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.




Dayanand Education Society's
hi road, Prakash Nagar, Latur, Maharashtra 413531, Inc

( ६-सप्टेंबर -२०२१ ):- लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्या प्रा.डॉ.सातपुते क्रांती यांच्या शुभहस्ते सरस्वती पुजन करुन डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली या प्रसंगी प्रा.सोनवणे समीप, प्रा.वडुळकर रघुनाथ,प्रा.कुलकर्णी योगेश हे उपस्थित होते.



( २५ सप्टेंबर २०२१ ):- जागतिक फार्मासिस्ट डे निमित्त आयोजित कार्यक्रमात फार्मासिस्ट ओथ घेताना महाविद्यालयीन  प्राध्यापक व कर्मचारी.



( २ ऑक्टोबर २०२१ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे उत्साहात साजरी करण्यात आली त्या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी.



( ९ ऑक्टोबर २०२१ ):- वेबिनार मीट द अलुमनी सत्र २ च्या पर्वात मार्गदर्शन करताना  जीपॅट राँकर व विद्यापीठ टॉपर विद्यार्थिनी केंद्रे प्रतिमा जीपॅट परीक्षे संदर्भात ऑनलाईन मार्गदर्शन करताना. तसेच प्रा.गोपाल लोहिया



( १३ ऑक्टोबर २०२१ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी द्वारा महाविद्यालयात कार्यरत प्राध्यापकांना रिसर्च फेलोशिप म्हणून प्रोत्साहन पर रु.५०,००० प्रत्येकी प्रदान करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी डॉ.डब्लू.एन.चाऊस, प्रा.अजय गडगुळ, प्रा.राहुल हुडे यांचा पुष्पगुच्छ व धनादेश देऊन सत्कार केला.








( २८ ऑक्टोबर २०२१ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारा आयोजित "मिशन युवा स्वास्थ्य" कोविड-१९ लसीकरण शिबीर प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.पूनम नत्थानी, डॉ.बंगाळे,प्रा.राहुल वाघमारे व कर्मचारी वृंद.



( ३१ऑक्टोबर २०२१ ):- लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारा " राष्ट्रीय एकात्मता दिन " साजरा करण्यात आला. या वेळी एकात्मतेची शपथ घेण्यात आली या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते,प्रा.समीप सोनवणे,प्रा.राहुल वाघमारे व प्राध्यापक वृंद.



( ४ डिसेंबर २०२१ ):- जागतिक एड्स दिना निमित्त दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी तर्फे पोस्टर प्रझेंटेशन व क्विझ कॉम्पिटिशन आयोजित करण्यात आले या वेळी क्विझ कॉम्पिटिशन मधील सहभागी विद्यार्थी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे विभाग प्रमुख डॉ.बेल्लाळे प्रा.रघुनाथ वडुळकर व प्राध्यापक वृंद.





( ७ डिसेंबर २०२१ ):- टेबल टेनिस स्पर्धेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत विजय प्राप्त केला. या वेळी सहभागी विद्यार्थी खेळाडूंचे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी कौतुक करत अभिनंदन केले.या प्रसंगी क्रीडा शिक्षक प्रा.ऋषी मस्के, प्रा.प्रकाश शिवनेचारी यांची उपस्थिती होती.



(११ डिसेंबर २०२१ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे  रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या कार्याक्रमाचे उद्धाटन प्रमुख अतिथी दयानंद विधी महाविद्यालय,लातूर च्या प्राचार्या डॉ. पूनम नत्थानी व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते यांच्या हस्ते फीत कापून व दीपप्रज्वलन करून झाले. ज्यात ५३ विद्यार्थी, विद्यार्थीनींनी व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून उतस्फुर्त सहभाग नोंदविला.



(१२ डिसेंबर २०२१ ):- विद्यापीठस्तरीय फुटबॉल स्पर्धेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत द्वितीय क्रमांक प्राप्त केला.या वेळी सहभागी विद्यार्थी खेळाडूंचे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी कौतुक करत अभिनंदन केले.या प्रसंगी क्रीडा शिक्षक प्रा.ऋषी मस्के, डॉ.वाजिद चाऊस ,प्रा.समीप सोनवणे यांची उपस्थिती होती.



(१८ डिसेंबर २०२१ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त व्याख्यान,ग्रंथ प्रदर्शन, निबंध स्पर्धा इ. विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. प्रा.डॉ.संदीप जगदाळे यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने व दीप प्रज्वलन करून झाली या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सातपुते क्रांती व शैक्षणिक कार्यप्रमुख प्रा.सोनवणे समीप, फार्मासुटिक्स चे वि. प्र. डॉ.चाऊस वाजीद ,सांस्कृतीक वि. प्र.प्रा.गोपाल लोहीया यांची प्रमुख उपस्थिती होती.





आज़ादी का
अमृत महोत्सव


आज़ादी का
अमृत महोत्सव
दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,
Society's
College,
shtra.

(३१ डिसेंबर २०२१ ):- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने अ विभाग आंतरमहाविद्यालयीन मुलांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते संपन्न झाले. उद्घाटन प्रसंगी शिक्षण संस्थेचे युवा सदस्य अजिंक्य भैय्या सोनवणे व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,विद्यापीठाचे बी.ओ.एस. मेंबर डॉ.भास्कर रेड्डी, डॉ.महेश बेंबडे, महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा.ऋषी मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती.



(१ जानेवारी २०२२):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर च्या रा.से.यो. विभागा तर्फे ग्राम स्वछता अभियाना अंतर्गत मौजे खोपेगाव येथे ग्राम स्वछता करण्यात आली. या ग्राम स्वच्छतेचे आयोजन माहाविद्यालया तर्फे प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी केले. तर कर्यक्रमाचे नियोजन रा.से.यो.वि.प्र.प्रा.राहुल वाघमारे यांनी केले.या प्रसंगी सरपंच रवी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमात रा.से.यो.वि. च्या ७४ विद्यार्थी,विद्यार्थिनींचा सहभाग होता.




Dayanand Education Society's
YANAND COLLEGE OF PHARMACY
Latur
tional Service Scheme
ष्ट्रीय सेवा योजना
NSS Unit
Latitude: 18.353083
Longitude: 76.563675
Elevation: 672.38±66 m
Accuracy: 4.7 m
Time: 01-01-2022 16:21
Note: Nss DCOP

(५ जानेवारी २०२२):- "सकाळ" माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क म्हणजेच “यिन” च्या लातूर शहराध्यक्षपदी दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी ची विद्यार्थिनी वीर ऐश्वर्या यांची निवड कारणात आली. तिच्या या निवडी बद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते आणि प्राध्यापकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.



(७ जानेवारी २०२२):- जिल्हा मानसिक आरोग्य विभाग व व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्य या विषयावर एक दिवशीय कार्य शाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रमुख वक्त्यांचे स्वागत करताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते आणि प्राध्यापकवृंद.



(५ जानेवारी २०२२):- १२ व्या राष्ट्रीय मतदार दिना निमित्त दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित,दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर मध्ये " राष्ट्रीय मतदार दिन " सजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले तर त्याचे नियोजन रा.से.यो.विभागा तर्फे वि.प्रमुख प्रा.राहुल वाघमारे यांनी केले. महाविद्यालयीन शिक्षक व शिकेत्तर कर्मचाऱ्यांना मतदान शपत देण्यात आली.



( ३ फेब्रुवारी २०२२ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी तर्फे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा  विद्यापीठ, नांदेड तर्फे घेण्यात आलेल्या बी.फार्म  २०२०-२०२१ अंतिम वर्षाच्या परीक्षेत विद्यापीठातून प्रथम येणारी या महाविद्यालयातील विद्यार्थिनी गुरमे सुप्रिया हिचा १०,००० ₹ चा धनादेश,भेटवस्तू व पुष्पवृक्ष देवून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी सहाय्यक सचिव ऍड.श्रीकांत उटगे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती.



( ११ फेब्रुवारी २०२२ ):-  डॉ. क्रांती सातपुते व सहकार्यां द्वारा लिखित इन्सट्रूमेंटल मेथड्स ऑफ ऍनालिसिस (Instrumental methods of Analysis) या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेडचे प्र.कुलगुरू डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन व दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी आणि सचिव श्री रमेश बियाणी तसेच दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.साळुंके व दयानंद विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पूनम नथानी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी पुस्तकाचे सहलेखक वैजिनाथ डिगे,तृप्ती राजमान्य,यांची प्रमुख उपस्थिती होती.




दयानंद शिक्षण संस्था लातूर


दयानंद शिक्षण संस्था लातूर


दयानंद शिक्षण संस्था लातूर

( २१ फेब्रुवारी २०२२ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी तर्फे "इंग्लिश कम्युनिकेशन स्किल" या विषयावर डॉ.नितीन डोके यांचे एक दिवशीय मार्गदर्शन परिसंवाद महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट आणि आय.क्यू.ए.सी.विभाग तर्फे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते सहसंयोजक प्रा.महेश बिराजदार,प्रा.गोपाल लोहिया,कार्यक्रम समन्वयक प्रा.तृप्ती राजमान्य यांनी आयोजित केला.



( २४ फेब्रुवारी २०२२ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी तर्फे शोध ऍडव्हानटेक लि. औरंगाबाद येथे अभ्यासपूर्ण सहल आयोजित करण्यात आली होती त्या प्रसंगी महाविद्यालयीन डी.फार्म,बी.फार्म,आणि एम.फार्म चे विद्यार्थी व प्राध्यापक वृंद.




GPS Map Camera
Aurangabad, Maharashtra, India
25, MIDC Industrial Area, Chilkalthana, Aurangabad,
Maharashtra 431006, India
Lat 19.876437°
Long 75.377308°
24/02/22 03:16 PM
Google


GPS Map Camera
Aurangabad, Maharashtra, India
25, MIDC Industrial Area, Chilkalthana, Aurangabad, Maharashtra 431006, India
Lat 19.876476°
Long 75.377304°
24/02/22 02:51 PM
Google


GPS Map Camera
Aurangabad, Maharashtra, India
25, MIDC Industrial Area, Chilkalthana, Aurangabad, Maharashtra 431006, India
Lat 19.876441°
Long 75.377302°
24/02/22 04:00 PM

( २६ फेब्रुवारी २०२२ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी तर्फे "स्पोर्ट्स ऍक्टिव्हिटी डे" साजरा करण्यात आला त्या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते, प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी सहभागी होते.



( ८ मार्च २०२२ ):- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये प्रा.डॉ.अर्चना येलमटे यांचा पी.एचडी पदवी प्राप्तकेल्या बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी तर प्रा.रोहित सारडा यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करते वेळी दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरविंदरावजी सोनवणे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी,ललितकुमारजी शहा,डॉ.सुरेशजी भट्टड,विशालजी लाहोटी व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांची प्रमुख उपस्थिती होती.








( ३१ मार्च २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे अन्नातील भेसळ कशी ओळखावी यावर परिसंवाद आयोजित केला होता. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून  फूड अँड ड्रग ऍडमिनिस्ट्रेशन चे असिस्टंट कमिशनर दयानंद पाटील व त्यांचे सहकारी आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांची उपस्थिती होती.




FOOD SAFETY ON WHEELS
TRAINING / प्रशिक्षण
TESTING / परीक्षण
AWARENESS / जागृति
Be a food smart consumer
Latitude: 18.401554
Longitude: 76.556567
Elevation: 640.29±5 m
Accuracy: 8.4 m
Time: 03-31-2022 13:12


शुध्द मध
हळद
चांगला चहा
मिरची पावडर
Latitude: 18.400734
Longitude: 76.556955
Elevation: 684.02±60 m
Accuracy: 100.0 m
Time: 03-31-2022 11:36



( ८ एप्रिल २०२२ ) :- जागतिक आरोग्य दिना निमित्त दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथे जनसामान्यात व विद्यार्थ्यां मध्ये आरोग्य विषयक जनजागृती व्हावी तसेच त्यांना आरोग्य विषयक आपले मत परखड पणे मांडता यावे म्हणून "आरोग्य विषयक समूहचर्चा" व "आरोग्य विषयक शॉर्ट व्हिडीओ क्लिप " स्पर्धा महाविद्यालयाच्या रा.से.यो.विभागा तर्फे ईट राईट्स कॅम्पस अंतर्गत आयोजित केली होती. या प्रसंगी सभागी विद्यार्थी आणि प्राध्यापकवृंद



( १६ एप्रिल २०२२ ) :- दयानंद एज्युकेशन सोसायटी कॅम्पस लातूर ला मिनिस्ट्री ऑफ हेल्थ अँड फॅमिली वेलफेअर गवर्नमेंट ऑफ इंडिया च्या एफ.एस.एस.ए.आय अर्थात फूड सेफ्टी अँड स्टॅंडर्डस अथॉरिटी ऑफ इंडिया कडून "इट राईट कॅम्पस" अंतर्गत गाईडलाईन्स पाळून नियम व अटी नुसार केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल व राबविलेल्या विविध उपक्रमांबद्दल एक्सलंट म्हणून फाइव स्टार मानांकन प्रदान करण्यात आले आहे. या साठी कोऑर्डिनेटर म्हणून प्रा.रोहित सारडा यांनी काम पहिले.



( ११ एप्रिल २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी.



( १४ एप्रिल २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब यांच्या जीवनावर आधारित नाटिका सादर केली या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व प्राध्यापकवृंद,विद्यार्थीआणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



( १९ एप्रिल २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे आय.पी.आर.अर्थात इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स या विषयावरील वर्कशॉप चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून फार्मा लिटरॅटी,लातूर चे डायरेक्टर विजय कुमार शिवपुजे हे उपस्थित होते.






( २३ एप्रिल २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त "भारतीय संविधान आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर" या विषयावर दयानंद कला महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संतोष पाटील यांचे व्याख्यान आयोजित केले होते.व्याख्यान प्रसंगी बोलताना ते म्हणाले स्वातंत्र्य समता न्याय आणि बंधुता हे सर्व संविधाना मुळेच..! शक्य झाले.



(२८ एप्रिल २०२२ ) :- स्वा.रा.ती.म.वि.,नांदेड व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर आणि इनोव्हेशन इन्क्युबेशन अँड लिंकेजेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित “ स्टार्टअप कॅम्प " या सदरात एक दिवसीय जिल्हा स्तरीय परिसंवाद संपन्न झाला. या परिसंवादास प्रमुख पाहुणे म्हणून इनोव्हेशन इन्क्युबेशन अँड लिंकेजेस स्वा.रा.ती.म.वि.नांदेड चे डॉ.आर.एस.माने, स्वा.रा.ती.म.वि. उपकेंद्र लातूर चे डॉ.आर.एस.शिंदे, स्कूल ऑफ फार्मसी स्वा.रा.ती.म.वि.नांदेड चे डायरेक्टर डॉ.एस.जे.वाढेर व स्कूल ऑफ फार्मसी स्वा.रा.ती.म.वि.नांदेड चे प्रा.डॉ.एस.जी.गट्टानी यांची उपस्थिती होती. तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, सदस्य डॉ.सुरेश भट्टड, ज्ञानोबा शेळके व संयोजक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,सहसंयोजक प्रा.योगेश कुलकर्णी यांची हि प्रमुख उपस्थिती होती.




DCOP In Collabration with
WELCOME TO START-UP CAMP
SRTMUN


DCOP In Collaboration with
WELCOME TO STARTUP CAMP
SRTMUN





Hon. Shri. Arvindraoji Sonvane
Vice President, Dayanand Education Society, Latur.
Hon. Shri. Laxmiramanji Lahoti
Hon. Shri, Rameshji Biyani
Member, Dayanand Education
Date & Time


S.R.T.M.U.Nanded
:OUR PATRONS:
Hon. Shri. Laxmiramanji Lahoti
Hon. Shri. Arvindraoji Sonvane
Vice President, Dayanand Education Society, Latur.
Hon. Shri. Lalitbhai Shah
Vice President, Dayanand Education Society, Latur.
Rameshkumar Rathi
Suresh Bhattad
Hon. Shri. Ajinkya
Member, Dayanand Education
Hon. Dr. Mehul Rathod
Member, Dayanand Education Society, Latur.


In Collaboration with
Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
Organize District Level Camp On
Start-up
:GUEST OF HONOUR:
Dr. R. S. Shinde
Dr. R. S. Mane
Dr. S. J.Wadher
Dr. S. G. Gattani
:OUR PATRONS:
Hon. Shri. Laxmiramanji Lahoti
President, Dayanand Education Society, Latur.
Hon. Shri. Arvindraoji Sonvane
Hon. Shri. Lalitbhai Shah
Hon. Shri. Rameshkumar Rathi
Vice President, Dayanand Education Society, Latur.
Hon. Shri. Suresh Jain
Hon. Dr. Suresh Bhattad
Trustee Member, Dayanand Education Society, Latur.
Hon. Shri. Vishal Lahoti
Hon. Dr. Mehul Rathod
CONVENOR
Dr. Satpute K. L.
Principal
Co-ordinator
Mr. Kulkarni Y.P.
Assistant Professor
DAYANAND COLLEGE OF PHARMACY
LATUR
Dayanand Education Society's
OF
PHARMACY
BARSHI ROAD,
HOW?


Dayanand Education Society's
Dayanand College of Pharmacy, Latur.
In Collaboration with
Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded
Organize District Level Camp On
Start-up
GUEST OF HONOUR:
OUR PATRONS:
Hon. Dr. Mehul Bathod
Coordinator
Mr. Kulkarni Y.P.
Assistant Professor
Dayanand College of Pharmacy, Latur.
Entrepreneurship and Start-up
for Students

( ५ मे २०२२ ) :- दयानंद शिक्षण संस्था लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर चे " झील २०२२ " हे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्धाटक व प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे सुप्रसिद्ध डॉक्टर,प्लास्टिक सर्जन व सर्जनशील व्यक्तिमत्व असणारे डॉ.विठ्ठल लहाने  हे उपस्थित होते. या प्रसंगी मंचावर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते, डॉ.वाजीद चाऊस, प्रा.समीप सोनवणे, प्रा.गोपाल लोहिया, विद्यार्थी प्रतिनिधी पवन गुरमे, विजय चव्हाण, नीता पवार, वीर ऐश्वर्या यांची उपस्थिती होती.




ZEAL-2022
fun, Music & Cultural Events
VENUE
DATE
5,6 MAY 2022


HARMACY
HERING
022
tural Event
Ka
Amrit
Mahotsav




Dayanand Education Society's
Dayanand College of Pharmacy, Latur
DAYANAND COLLEGE OF PHARMACY
LATUR




Dayanand Education Society's
Dayanand College of Pharmacy, Latur
DAYANAND COLLEGE OF PHARMACY
LATUR





Dayanand Education Society's
DAYANAND COLLEGE OF PHARMACY
&
DAYANAND INSTITUTE OF PHARMACY
Organises
ANNUAL SOCIAL GATHERING
ZEAL-2022
Sports, fun, Music & Cultural Events
VENUE
DATE


Dayanand Education Society's
DAYANAND COLLEGE OF PHARMACY
&
DAYANAND INSTITUTE OF PHARMACY
Organises
ANNUAL SOCIAL GATHERING
ZEAL-2022
Sports, fun, Music & Cultural Events
VENUE
DATE
5,6 MAY 2022


DAYANAND COLLEGE OF PHARMACY
&
DAYANAND INSTITUTE OF PHARMACY
Organises
ANNUAL SOCIAL GATHERING
ZEAL-2022
Sports, fun, Music & Cultural Events
DATE



Dayanand Education Society's
DAYANAND COLLEGE OF PHARMACY
&
INSTITUTE OF PHARMACY
Organises
SOCIAL GATHERING
-2022
Cultural Events
DATE
5.6 MAY 2022

(१४ मे २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर तर्फे महाविद्यालयात रा.से.यो.विभागा तर्फे हेल्थ चेकअप कॅम्प चे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,रा.से.यो.विभाग प्रमुख प्रा.राहुल वाघमारे,प्रा.सुचिता शेटकार व महाविद्यालयीन प्राध्यापकवृंद विद्यार्थी विद्यार्थिनी बहूसंख्येने  उपस्थित होते.



(२१ मे २०२२ ) :- भारत सरकारच्या मानव विकास संसाधन मंत्रालयाच्या वतीने अखील भारतीय स्तरावर फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या जीपॅट (ग्रॅज्युएट फार्मसी अपटीट्युड टेस्ट) व सीमॅट (कॉमन मॅनेजमेण्ट ऍडमिशन टेस्ट) या परीक्षेत लातूर येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी व दयानंद इंस्टीट्यूटऑफ फार्मसी या महाविद्यालयातील तब्बल ३० विद्यार्थी (जीपॅट-२७ व सीमॅट-३) परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. या निकाला मुळे प्रतिवर्षा प्रमाणे देशात लातूर मधील दयानंद शिक्षण संस्थेचा जीपॅट व सीमॅट सारख्या परीक्षेत यशाचा नवा पॅटर्नच निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा, प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते, प्राचार्य डॉ.श्रीनिवास बुमरेला,जीपॅट विभागप्रमुख आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंदानी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



(२१ मे २०२२ ) :- जीपॅट व सीमॅट परीक्षेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर च्या १७ विद्यार्थ्यानी उत्तुंग असे यश मिळवले त्यात सूर्यवंशी अविनाश नागनाथ १६०,साखरे विजयकुमार संजीवकुमार १५९,काळे सिद्धेश्वर दामोधर १५४,कुर्रेवार ज्ञानेश्वर राजकुमार १५४,करडे नमृता सुरेश १४७,पवार नीता बालाजी १३२,नंदगुरे पूजा ग्यानबा १२७, पाचलिंग बलराज बालाजी १२५,ढेकणे विकास वसंत १२४,बनसोडे ओमश्री लक्ष्मणराव १०३,कऱ्हाळे पूजा सोनाजी ८०,वाल्मिकी रितू अजित ७६,कुंभारवाड प्रवीण परसराम ७५,नायगावकर मयुरी मधुकर ६२,चव्हाण विजय परमेश्वर १६१,लोखंडे ऋषभ विष्णुकांत १५०,कदम कृष्णकांत लहुराज १०६ इतका स्कोअर मिळवून राष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केले आहे. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व महाविद्यालयातील प्राध्यापकवृंदानी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले



(२३ मे २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर ची माजी विद्यार्थिनी जीपॅट व नायपर क्वालिफाईड प्रतिमा प्रकाश केंद्रे  हिचे जीपॅट व नायपर राख्या परीक्षेत कसे यश मिळवता येईल याबद्दल गेस्ट लेक्चर आयोजित करण्यात आले होते.या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.



(२७ मे २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर येथे नागपूरच्या फार्मसी महाविद्यालयाचे डॉ.राजेश लोहिया,डॉ.बियाणी आणि डॉ.ताथोडे सर यांनी सदिच्छा भेट दिली त्या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,डॉ. वाजिद चाऊस, प्रा.समीप सोनवणे, प्रा.रघुनाथ वडुळकर व प्रा.गोपाल लोहिया हे उपस्थित होते.



(४ जून २०२२ ) :- दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर येथे जागतिक पर्यावरण दिना निमित्त भारत सरकार च्या पेट्रोलियमआणि प्राकृतिक गॅस मंत्रालय (पीसीआरए) यांच्या संयुक्त विद्यमाने "एनर्जी सोर्सेस फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट" या विषयावर एकदिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. या कर्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व प्रमुख वक्ते म्हणून पीसीआरए विद्याशाखेचे प्रमुख,एनर्जीऑडिटर केदार खामीतकर आणि किरण खामीतकर व प्रा.समीप सोनवणे हे उपस्थित होते.



(४ जून २०२२ ) :- दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर येथे जागतिक पर्यावरण दिना निमित्त भारत सरकार च्या पेट्रोलियमआणि प्राकृतिक गॅस मंत्रालय (पीसीआरए) यांच्या संयुक्त विद्यमाने "एनर्जी सोर्सेस फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट" या विषयावर एकदिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी उपस्थित प्राध्यापकवृंद व विद्यार्थी.



( ६ जून २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे शिवस्वराज्य दिन  उत्साहात साजरा करण्यात आला या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.



(११ जून २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर येथे डॉ. डी.वाय. पाटील इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस & रिसर्च,पिंपरी पुणे येथील फार्माकोग्नोसी विभागाचे विभाग प्रमुख डॉ.संतोष एस.भुजबळ यांनी सदिच्छा भेट दिली त्या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,डॉ. वाजिद चाऊस, प्रा.समीप सोनवणे,डॉ.श्रद्धा तिवारी, प्रा.रघुनाथ वडुळकर व प्रा.अजय गडगूळ हे उपस्थित होते.



(१५ जून २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर येथे डॉ. डी.वाय. पाटील इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस & रिसर्च,पिंपरी पुणे येथील प्रोफेसर अँड हेड ऑफ फार्मासुटिक्स डिपार्टमेंट वाय.बी.चव्हाण कॉलेज ऑफ फार्मसी,औरंगाबाद चे डॉ.स्वरूप लाहोटी यांनी सदिच्छा भेट दिली त्या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,डॉ. वाजिद चाऊस, प्रा.समीप सोनवणे, प्रा.रघुनाथ वडुळकर, प्रा.अजय गडगूळ,प्रा.रोहित सारडा,प्रा.सज्जाउद्दीन सय्यद हे उपस्थित होते.



(३ जुलै २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर येथे जॉईंट डायरेक्टर, DTE रिजिनल ऑफिस,औरंगाबाद यांनी सदिच्छा भेट दिली त्या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,प्रा.रघुनाथ वडुळकर हे उपस्थित होते.



( ४ जुलै २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर येथे नवीन डिजिटल स्मार्ट बोर्ड चे उद्घाटन करताना व डेमो देत असलेल्या  प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,महाविद्यालयीन प्राध्यापकवृंद हे उपस्थित होते.



( २३ जुलै २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर येथे फेअरवेल पार्टी मध्ये विद्यर्थ्यांना पुष्प देऊन स्वागत करताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,महाविद्यालयीन प्राध्यापकवृंद हे उपस्थित होते.



( २४ जुलै २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर च्या रा.से.यो.विभागा तर्फे वृक्षारोपण शिबीर आयोजित केले होते.या प्रसंगी १५१ विविध उपयुक्त औषधी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी रा.से.यो.विभागप्रमुख प्रा.राहुल वाघमारे,प्रा.रोहित येरटे व रा.से.यो.विभागा चे महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.




जिल्हा अधिकार कार्यालय, लातूर.
Dayanand Education Society's
Dayanand College of Pharmacy
Barshi Road, Latur
राष्ट्रीय सेवा योजना
पर्यावरण, पाणी ,
मृदा संवर्धन करूया
झाडे लाऊ..!
झाडे जगवू..!
४१०० झाडे लागवड करू या .



जिल्हा अधिकार कार्यालय, लातूर.
Dayanand Education Society's
Dayanand College of Pharmacy
Barshi Road, Latur.
राष्ट्रीय सेवा योजना
पर्यावरण, पाणी ,
मृदा संवर्धन करूया
झाडे लाऊ..!
झाडे जगवू..!
स्थळ :
४१०० झाडे लागवड करू

( २९ जुलै २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर ला मांजरा नदीच्या तीरावर राबविलेल्या वृक्षारोपण शिबिरास उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार जिल्हा अधिकारी अमन मित्तल (आय.ए.एस) व मा.पाशा पटेल यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व रा.से.यो.विभागप्रमुख  प्रा.राहुल वाघमारे यांना देण्यात आला.



## ( ३० जुलै २०२२ ) :- दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर च्या अंतिम वर्षाचे विद्यार्थी प्रोजेक्ट वर्क चे सादरीकरण करताना.



पुण्यनगरी 14 - 7 - 2021

# विद्यापीठ परीक्षेत यशस्वी विद्यार्थिनींना दयानंद फार्मसी तर्फे रोख रक्कम वितरण



**लातूर / प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे घेण्यात आलेल्या बी.फार्म २०१९-२०२० अंतिम वर्षाच्या परीक्षेत लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित, दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील विद्यार्थिंनी विद्यापीठातून अनुक्रमे प्रथम व द्वितीय आलेल्या काळात या यशस्वी विद्यार्थीनींचा गुणगौरव सत्कार आयोजित न करता आल्याने गुणवंत यशस्वी विद्यार्थीनींचा सत्कार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांच्या हस्ते विद्यापीठातून प्रथम येणारी केंद्रे प्रतिमा हिचा १०,००० तर विद्यापीठातून द्वितीय येणारी शीतल सोमाणी हिचा ७,००० चा धनादेश व पुष्पवृक्ष देवून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी डॉ. वाजिद चाऊस, प्रा. समीप सोनवणे, प्रा. अजय गडगुळ, प्रा. रघुनाथ वडुळकर, प्रा. अर्चना येलमटे हे उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थिनींच्या या यशा बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा, महाविद्यालयातील प्रा. कुलकर्णी, प्रा. बिराजदार, प्रा. सारडा, प्रा. सय्यद, प्रा. हुडे, प्रा. वाघमारे, प्रा. तिवारी, प्रा. हलके, प्रा. मानके, प्रा. राख यांनी कौतुक करीत अभिनंदन केले आहे.

# विद्यापीठ परीक्षेत यशस्वी विद्यार्थिनींना दयानंद फार्मसीच्यावतीने रोख रक्कम वितरण

देशोन्नती वृत्तसंकलन...

## प्रा. क्रांती सातपुते यांच्या हस्ते

**लातूर ▪** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे घेण्यात आलेल्या बी.फार्म २०१९-२०२० अंतिम वर्षाच्या परीक्षेत लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित, दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील विद्यार्थिनी विद्यापीठातून अनुक्रमे प्रथम व द्वितीय आलेल्या काळात या यशस्वी विद्यार्थीनींचा गुणगौरव सत्कार आयोजित न करता आल्याने गुणवंत यशस्वी विद्यार्थीनींचा सत्कार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांच्या हस्ते विद्यापीठातून प्रथम येणारी केंद्रे प्रतिमा हिचा १०,००० रुपये तर विद्यापीठातून द्वितीय येणारी शीतल सोमाणी हिचा ७,००० रुपयांचा धनादेश व पुष्पवृक्ष देवून सत्कार करण्यात आला.



**महाविद्यालयातील विद्यार्थिनी विद्यापीठातून अनुक्रमे प्रथम व द्वितीय आलेल्या काळात या यशस्वी विद्यार्थीनींचा गुणगौरव सत्कार आयोजित न करता आल्याने गुणवंत यशस्वी विद्यार्थीनींचा सत्कार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांच्या हस्ते प्रथम आलेल्या प्रतिमा केंद्रे, द्वितीय येणारी शीतल सोमाणी यांचा सन्मान करण्यात आला.**

या प्रसंगी डॉ. वाजिद चाऊस, प्रा. समीप सोनवणे, प्रा. अजय गडगुळ, प्रा. रघुनाथ वडुळकर, प्रा. अर्चना येलमटे हे उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थिनींच्या या यशा बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे , ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा महाविद्यालयातील प्रा. कुलकर्णी , प्रा. बिराजदार, प्रा. सारडा, प्रा. सय्यद, प्रा. हुडे, प्रा. वाघमारे, प्रा. तिवारी, प्रा. हलके,प्रा. मानके, प्रा. राख यांनी कौतुक करत अभिनंदन केले आहे.

ePaper देशोन्नती
Wed, 14 July 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/61795860

दि:- २३- जुलै- २०२१ **आदर्श गावकरी**

# दयानंद फार्मसी महाविद्यालयात वेबिनार

**लातूर :** दयानंद शिक्षणसंस्था, लातूरद्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर नुकतेच सहा दिवसीय फार्मसीच्या विविध उपयुक्त व प्रभावी अशा विषयांवर वेबिनार आयोजित करण्यात आले. या वेबिनार सिरीजचे संयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते व वेबिनार समन्वयक डॉ.वाजिद चाऊस, प्रा.बिराजदार महेश, प्रा.मानके महेश यांनी आयोजित केले होते.

इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राईट्स या विषयावर कुमारस्वामी महाविद्यालय, औसाचे प्राचार्य डॉ. बेटकर एमएम, प्रेव्हेंटिंग सेक्सच्युअल हर्याशमेंट एँट वर्कप्लेस या विषयावर दयानंद विधी महाविद्यालय, लातूरच्या प्राचार्या डॉ. नत्थानी पी.पी. ओरिएन्टेशन ऑन इंडस्ट्रियल ट्रेनिंग प्रोग्राम या विषयावर शोध अॅडव्हानटेक एलएलपी, औरंगाबादचे प्रमुख संस्थापक मैत्रेय मुडकवी, इंटरेप्रेनरशिप अपॉर्च्युनिटीझ इन फार्मा सेक्टर या विषयावर युफोरिया लाईफ सायन्सेस एलएलपी, पुणेचे मार्केटिंग डायरेक्टर प्रा. राम पेंटेवार, ओव्हरव्हीयु ऑफ मॅनुफॅक्चरिंग ऑफ




सॉलिड डोसेज फॉर्म-इंडस्ट्रियल आस्पेक्ट या विषयावर ओमान फाम सिुटिकलप्रॉडक्ट्स, ओमानचे असिस्टंट मॅनेजर येरोळे प्रसाद, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, स्किल एन्हान्समेंट अँड माईंड ट्रेनिंग या विषयावर मुंबईचे सॉफ्टवेअर इंजिनियर अर्शद सय्यद आदी मान्यवर विषय तज्ञांनी आपापल्या विषयांवर अतिशय उपयुक्त आणि परिणामकारक अद्ययावृत्त अशी माहिती दिली. औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) हे देशातील सर्वांत विकसित आणि आव्हानात्मक क्षेत्र आहे आणि फार्मसी शाखा ही आरोग्य विज्ञानातील प्रमुख शाखांपैकी एक आहे. हे प्रगतीशील क्षेत्र ओळखले जाते त्याची उपयुक्तता कशी आहे, याबाबत माहिती करून देण्यासाठी व विविध विषयातील अद्ययावत माहिती मिळावी, म्हणून ही ऑनलाईन वेबिनार श्रृंखला महाविद्यालयातर्फे खास विद्यार्थी, फार्मसी क्षेत्रातील तज्ञ यांच्याकरिता आयोजिली होती आणि या ऑनलाईन वेबिनारमध्ये बी.फार्म, डी.फार्मच्या ४३८ विद्यार्थी, विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवून वेबिनार यशस्वी केला.

या ऑनलाईन वेबिनार उपक्रम बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.


Auranagabad Edition
23 July, 2021 Page No. 5
Powered by : eReleGo.com

THURSDAY | 12 AUGUST 2021
AURANGABAD

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/

Aribam Sharma is new Beed district collector

# D, B Pharm students given warm farewell

LOKMAT NEWS NETWORK
LATUR, AUG 11

Dayanand College of Pharmacy, run by Dayanand Shikshan Sanstha, given a warm farewell to D Pharm and B Pharm final-year students, here recently.

The farewell ceremony was conducted online in compliance with Covid-19 restrictions. The event was graced by prominent speaker Sachin Itkar, and Ramesh Biyani.

The welcome address recalling memories of the students was given by principal Dr Satpute Kranti. Itkar guided students on career opportunities in pharmaceutical management, clinical trials and drug regulation. He urged students to keep abreast of new developments in their field, improve communication skills and enhance personality development. Final-year students namely Anawade Geeta, Sawant Aishwarya, Pawar Abhishek and Khodse Shankar also expressed their views and were all praise for their college and teachers.

Head of college cultural department Gopal Lohiya worked for the success of the event, while Trupti Rajmanya anchored the programme and Naresh Halke proposed vote of thanks.

Dayanand Shikshan Sanstha president Laxmiraman Lahoti, vice-president Arvind Sonawane, Lalitbhai Shah, secretary Ramesh Biyani, joint secretary Suresh Jain, treasurer Sanjay Bora, all the teaching and non-teaching staff wished all the students best luck for their future endeavours.

प्रतिव्यवहार PRATIVAHIR शुक्रवार दि. १३ ऑगस्ट २०२१ पान २

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ ऑनलाईन द्वारे संपन्न

लातूर : दयानंद शिक्षण संस्था,लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मधील डी.फार्म व बी.फार्म अंतिम वर्षाच्या २०२१ या बॅचच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ ऑनलाईन आयोजित केला होता.कोरोना महामारीच्या सद्य परिस्थितीचा आढावा घेत निरोप समारंभ पारंपारिक मार्गाने न घेता ऑनलाईन पद्धतीने निरोप समारंभ घेण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून फार्मसी क्षेत्रातील सुप्रसीध्द लेखक व स्ट्रॅटिजिक फोरेस्टिक ग्रुपचे सिनियर प्रोग्रॅम ऍडव्हायजर सचिन इटकर तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री रमेशजी बियाणी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा देत महाविदयालयाच्या प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते यांनी केले.

प्रमुख पाहुणे व वक्ते सचिन इटकर यांनी करियर अपॉर्च्युनिटीज इन फार्मासुटिकल मॅनेजमेन्ट , क्लीनिकल ट्रायल, ड्रग रेगुलेशन तसेच विद्यार्थ्यांनी अद्ययाव्रत ज्ञान कसे ठेवावे, फार्म करियर मध्ये संभाषण कौशल्य कसे वाढवावे, वक्तिमत्व विकास कसा वाढवावा याबद्दल अत्यंत प्रभावी पणे मार्गदर्शन करत उपस्थित विद्यार्थ्यांना फार्मसीक्षेत्रातील पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांनी पुढील शिक्षणासाठीच्या संधीबद्दल माहिती दिली.

यावेळी महाविद्यालयाबद्दल व तेथील शिक्षक आणि सोईसुविधां बद्दल प्रशंसा करत अंतिम वर्षाच्या अनावडे गीता , सावंत ऐश्वर्या, पवार अभिषेक व खोडसे शंकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गोपाल लोहिया तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तृप्ती राजमान्य यांनी आणि आभार प्रदर्शन प्रा. नरेश हलके यांनी केले.



# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात वृक्षारोपण




**लातूर (प्रतिनिधी)** – येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये १७ ऑगस्ट २०२१ रोजी सामाजिक जाणिव लक्षात घेवून राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत वृक्ष वाढीकरिता असलेलं उपयुक्त वातावरण लक्षात घेत महाविद्यालयाच्या प्रांगणात व फार्मसी च्या बॉटनिकल गार्डनमध्ये वृक्षारोपण शिबीर उत्साहात संपन्न झाले.

या वृक्षारोपण शिबीराचे उद्धाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते व दयानंद विज्ञान म हाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. मेघा पंडित तसेच रा.से.यो.चे प्रमुख प्रा. वाघमारे आर. एस. यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यायातील प्रा. समीप सोनवणे, प्रा. रघुनाथ वडुळकर, प्रा. महेश बिराजदार, प्रा. अजय गडगुळ, सांस्कृतिक वि. प्रमुख प्रा. गोपाल लोहिया, प्रा. रोहित सारडा, प्रा. महेश मानके, प्रा. नरेश हलके, प्रा. राहुल हुडे, प्रा. योगेश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी उपयुक्त औषधी वृक्षांचे व पुष्प वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. हा वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी करण्यात महाविद्यालयीन सर्व कर्मचाऱ्यां सोबत अजय मस्के, प्रदीप सोमवंशी, संजय देशमुख यांनी सहकार्य केले.

दि :- ३-९-२०२१ मराठवाडा नेता

# दयानंद फार्मसीचा चंद्रात्रे मिहीर लातूरमध्ये प्रथम



चंद्रात्रे मिहीर मंदार
९७.६०%
डी. फार्म प्रथम वर्ष



जाधव ओंकार गजानन
९३ .६०%
डी. फार्म प्रथम वर्ष





लातूर दि. २ :....

एम.एस.बी.टी.ई. अर्थात महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्नीकल एज्युकेशन मार्फत घेतलेल्या अंतिम वर्ष डी. फार्मसी च्या उन्हाळी २०२१ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असुन या परीक्षेमध्ये दयानंद शिक्षण संस्थेच्या लातूर येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर चा निकाल १००% लागला असुन यशाची उज्वल परंपरा कायम राखत डी.फार्म च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. डी. फार्मसी द्वितीय वर्षातील चंद्रात्रे मिहीर मंदार ९७.६०% गुण घेऊन लातूर मध्ये प्रथम आला आहे तसेच, जाधव ओंकार गजानन ९३ .६०% कु.सावंत ऐश्वर्या आनंद ९२.४०% व हजारे बिरू विठ्ठल ९२.४० % तर डी. फार्मसी प्रथम वर्ष मधून कु. बागवान सना गौसोद्दीन ९४.६४%, कु.नारायणपुरे दीक्षा विष्णू ९१.९१%, पठाण अब्दुल रेहमान ९१.६०%, गुण मिळवून महाविद्यालयातून अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे या परीक्षेस बसलेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून१००% विद्यार्थी विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाचे श्रेय महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांच्या सूत्रबद्ध नियोजनाला व सर्व विद्यार्थ्यांच्या आणि प्राध्यापकांच्या अथक परिश्रमांना दिले आहे. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल सर्व संस्थाचालकांसह महाविद्यालयातील डी.फार्म विभागाचे प्रा.प्रकाश शिवनेचारी, प्रा.तनुजा वारद,प्रा.सुचिता शेटकार,प्रा.येरटे रोहित,प्रा. प्रिया येन्नावार यांनी कौतुक करत अभिनंदन केले आहे.

दि:- ४-९-२०२१
पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 8
04 Sep 2021

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचा चंद्रात्रे मंदार ९७.६० टक्के घेऊन प्रथम

**लातूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्नीकल एज्युकेशन मार्फत घेतलेल्या अंतिम वर्ष डी. फार्मसीच्या उन्हाळी २०२१ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असुन या परीक्षेमध्ये दयानंद शिक्षण संस्थेच्या लातूर येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी लातूर चा निकाल १०० टक्के लागला आहे. या परीक्षेत डी.फार्मच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. डी. फार्मसी द्वितीय वर्षातील चंद्रात्रे मिहीर मंदार ९७.६० टक्के गुण घेऊन लातूर मध्ये प्रथम आला आह.



तसेच जाधव ओंकार गजानन ९३.६० टक्के, सावंत ऐश्वर्या आनंद ९२.४० टक्के, हजारे बिरू विठ्ठल ९२.४० टक्के तर डी. फार्मसी प्रथम वर्ष मधून बागवान सना गौसोद्दीन ९४.६४ टक्के, नारायणपुरे दीक्षा विष्णू ९१.९१ टक्के, पठाण अब्दुल रेहमान ९१.६० टक्के गुण मिळवून महाविद्यालयातून अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे या परीक्षेस बसलेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १०० टक्के विद्यार्थी विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाचे श्रेय महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांच्या सूत्रबद्ध नियोजनाला व सर्व विद्यार्थ्यांच्या आणि प्राध्यापकांच्या अथक परिश्रमांना दिले आहे. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल सर्व संस्थाचालकांसह प्रा. प्रकाश शिवनेचारी, प्रा. तनुजा वारद, प्रा. सुचिता शेटकार, प्रा. येरटे रोहित, प्रा. प्रिया येन्नावार यांनी कौतुक केले आहे.

# दयानंद फार्मसी महाविद्यालयात शिक्षकदिन उत्साहात

## डॉ. राधाकृष्णन् यांच्या कार्याला दिला उजाळा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** ■ येथील दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे सोमवारी शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्राचार्या प्रा. डॉ. सातपुते क्रांती यांच्या हस्ते सरस्वती पूजन करुन डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्ज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्रा. सोनवणे समीप, प्रा. वडुळकर रघुनाथ, प्रा. योगेश कुलकर्णी यावेळी उपस्थित होते. शिक्षकदिनाचे महत्त्व विविध उपक्रमाबाबत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सातपुते क्रांती यांनी माहिती दिली. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि शिक्षकदिन याबद्दल व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीबाबत मनोगत डॉ. चाऊस वाजिद, प्रा. गोपाल लोहिया व डॉ. श्रद्धा तिवारी यांनी व्यक्त केले.

कोरोना काळाच्या पार्श्वभूमीवर सदरील कार्यक्रम थेट ऑनलाईन प्रक्षेपित करण्यात आला. या प्रसंगी बी. फार्म अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी बी. फार्म तृतीय, द्वितीय व डी. फार्मसी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिकवले व सर्व उपस्थितांना शिक्षकदिनाबद्दल शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सावंत राधा, बरगजे पूजा, मिथाली सोनकांबळे, जाधव स्वप्नील, निखिल जाधव, कवाळे शकुंतला, वदाते भारती यांनी मनोगत व्यक्त करत सर्व प्राध्यापकांना ऑनलाइन माध्यमांद्वारे शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रा. प्रिया येन्नावर यांनी केले तर आभार नीता पवार या विद्यार्थिनीने मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व डी. फार्मसी व बी. फार्मसीचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# महारोगावरील औषध, वैद्यकशास्त्रातील मोठे योगदान असलेले डॉ. विठ्ठल रामकृष्ण

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला** ■ प्राच्यविद्या पंडित, पुरातत्त्वज्ञ, प्राचीनवस्तू संग्राहक, कर्ते समाजसेवक आणि कुशल धन्वंतरी, ग्रँट मेडिकल कॉलेजच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थी, मुंबईचे नगरपाल असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. रामकृष्ण विठ्ठल तथा भाऊ दाजी लाड यांची.



दिनविशेष

सारस्वत कुटुंबात झाला. लाडांचे वडील मातीच्या मूर्ती घडवणारे

### डॉ. रामकृष्ण विठ्ठल तथा भाऊ लाड यांची जयंती

दाजी लाड हे मराठी इतिहास-अभ्यासक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते आणि निष्णात डॉक्टर होते. ज्ञान प्रसारक सभा ही संघटना डॉ भाऊ दाजी लाड यांनी विकसित केली आहे. संस्कृत साहित्यिकांच्या जीवनकाळाबद्दल,

# फार्मासिस्ट डे निमित्त आयोजित स्पर्धेत देशभरातून १०४४ जणांचा उत्सफूर्त सहभाग



लातूर,दि.३० : दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर या महाविद्यालयात जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा करण्यात आला. फार्मासिस्ट डे चे औचित्य साधून कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राद्यापकांनी फार्मासिस्टओथ ची शपथ घेतली यावेळी महाविद्यालयांच्या वतीने वेलनेस क्राफ्ट स्पर्धेचे भव्य असे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. स्पर्धे निमित्त फार्म हॅन्डमेड पोस्टर स्पर्धा,फार्मासिस्ट:ऑलवेज ट्रस्टेड फॉर युअर हेअल्थ या विषयावर निबंध स्पर्धा,फार्मासिस्ट रोल इन रॅशनल युज ऑफ मेडिसिन्स या विषयावर व्हीडीओ क्लिप स्पर्धा आयोजिली होती.

स्पर्धेतील विजेत्यांना प्रत्येकी प्रथम ३०००/-रु द्वितीय २०००/-रु तृतीय १०००/-रु व सहभागिता प्रमाण पत्र देण्यात येणार आहे.या स्पर्धेत १०४४ जणांनी उत्स्फुर्त असा सहभाग नोंदवला. प्राध्यापकांनी फार्मासिस्ट डे चे महत्व सांगुन विद्यार्थ्यांना भावी जडनघडणीकरिता शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे मायक्रोसॉफ्ट टीम ॲप द्वारे प्रक्षेपण करण्यात आले.

# फार्मासिस्टडे निमित्त आयोजित स्पर्धेत १ हजार ४४ जणांचा उत्स्फुर्त सहभाग

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** ■ दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर या



महाविद्यालयात जागतिक फार्मासिस्टदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

फार्मासिस्टडेचे औचित्य साधून कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी 'फार्मासिस्टओथ' ची शपथ घेतली यावेळी महाविद्यालयांच्या वतीने 'वेलनेस क्राफ्ट' स्पर्धेचे भव्य असे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. स्पर्धे निमित्त फार्म हॅन्डमेड पोस्टर स्पर्धा, फार्मासिस्ट ऑलवेज ट्रस्टेड फॉर युअर हेल्थ या विषयावर निबंध स्पर्धा, फार्मासिस्ट रोल इन रॅशनल युज ऑफ मेडिसिन्स या विषयावर व्हीडीओ क्लिप स्पर्धा आयोजिली होती. स्पर्धेतील विजेत्यांना प्रत्येकी प्रथम ३०००/-रु. द्वितीय २०००/-रु. तृतीय १०००/-रु. व सहभागिता प्रमाण पत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेत १०४४ जणांनी उत्स्फुर्त असा सहभाग नोंदवला.

प्राध्यापकांनी फार्मासिस्टडेचे महत्व सांगुन विद्यार्थ्यांना भावी जडणघडणीकरिता शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे मायक्रोसॉफ्ट टीम ॲपद्वारे प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गोपाल लोहिया, प्रा. नरेश हलके, प्रा. राहुल वाघमारे, प्रा. अर्चना येलमटे, प्रा. प्रकाश शिवनेचारी यांनी यशस्वीरित्या केले.

सकाळ लातूर टुडे ५-१०-२०२१

# 'दयानंद विधी'मध्ये लिंगभाव संवेदनशीलतेवर कार्यशाळा

लातूर, ता. ४ (बातमीदार) : दयानंद विधी महाविद्यालय, दयानंद फार्मसी महाविद्यालय व नारी प्रबोधन मंचच्या वतीने लिंगभाव संवेदनशीलता या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा नुकतीच घेण्यात आली. पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते मिलिंद चव्हाण यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव ॲड. श्रीकांत उटगे होते. नारी प्रबोधन मंचच्या डॉ. कुसुम मोरे व प्रभारी प्राचार्या डॉ. पुनम नाथानी यांची प्रमुख उपस्थिती होती. लिंगभाव विषमतेमुळे स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण अधिक वाढत असून, लिंगभाव विषमता समजून घेताना आपल्याला त्याचे जात, वर्ग, धर्मनिरपेक्षता, भांडवलशाही या सर्वांशी असलेले गुंतागुंतीचे नाते समजून घेऊनच त्याचे विश्लेषण करावे लागेल.




लातूर : दयानंद विधी महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत बोलताना मिलिंद चव्हाण. याप्रसंगी उपस्थित ॲड. श्रीकांत उटगे, प्राचार्या डॉ. पुनम नाथानी, डॉ. कुसुम मोरे आदी.

तरच ही विषमता काही प्रमाणात संपविणे शक्य होईल, असे श्री. चव्हाण यांनी सांगितले. ॲड. उटगे यांनी पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये लिंगभाव संवेदनशील व्यक्ती निर्माण होण्याची गरज स्पष्ट केली. डॉ. नाथानी यांनी विद्यार्थ्यांनी केवळ वकील होऊन चालणार नाही, तर वकिलाकडे आलेल्या अन्यायग्रस्तांप्रती संवेदनशील राहण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे सांगितले. डॉ. मयूरी सामंत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. मोरे यांनी स्वयंसेवकांना संस्थेशी जोडून राहण्याचे आवाहन केले. कार्यशाळेसाठी राधाकृष्ण देशमुख, प्रा. अनुराधा सावरीकर, प्रा. नयन राजमाने, छाया शिंदे व विधी स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला होता. डॉ. शुभांगी पांचाळ व डॉ. संगीता महाजन यांनी सूत्रसंचालन केले.

Aurangabad, Latur-Today
05/10/2021 Page No. 3

सकाळ | लातूर-उस्मानाबाद
औरंगाबाद, बुधवार, २७ ऑक्टोबर २०२१
TODAY
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

# 'दयानंद'ची गुरमे विद्यापीठातून प्रथम


सुप्रिया गुरमे

लातूर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा २०२१ च्या बी. फार्मसी परीक्षेच्या निकाल लागला. यात दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखत घवघवीत मिळवले. महाविद्यालयातील चतुर्थ वर्षाची विद्यार्थिनी सुप्रिया गुरमे हिने अंतिम परिक्षेत ८६.३२ टक्के गुण मिळवून विद्यापीठातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. या विद्यार्थिनीचे संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते आदींनी अभिनंदन केले.

आनंद नगरी ANAND NAGRI दि :- २७ - १० - २०२१

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीची सुप्रिया-गुरमे विद्यापीठातून प्रथम

## महाविद्यालयाच्या यशाची उज्वल परंपरा कायम



महाविद्यालयीन जीवनात सृजनशील विचारांना प्रोत्साहन देणारी, संकटाना समर्थपणे पेलण्याची कार्यक्षमता निर्माण करून देणारी तसेच विद्यार्थी जीवनाला सार्थकता प्राप्त करून देणारी संस्था आणि अभ्यासू व जिज्ञासू प्राध्यापक वर्ग व उपलब्ध सोई सुविधा यामुळेच आम्ही यशस्वी होऊ शकलो. याच महाविद्यालयात सुरु झालेल्या एम.फार्म फार्मासूटीक्स व फार्मासूटीकल क्वालिटी एशुरन्स या आभ्यासक्रमास निश्चित प्रवेश घेण्याची इच्छा आहे.
**– सुप्रिया गुरमे, विद्यार्थिनी**

लातूर (प्रतिनिधी)– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा २०२१ च्या बी. फार्मसी परीक्षेच्या निकालात दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर च्या विद्यार्थ्यांनी प्रतिवर्षा प्रमाणे यशाची उज्वल परंपरा कायम राखत घवघवीत असे यश मिळविले आहे. महाविद्यालयातील चतुर्थ वर्षाची विद्यार्थीनी कु. सुप्रिया येलबा गुरमे हीने अंतिम परिक्षेत ८६.३२ टक्के गुण मिळवून विद्यापीठातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला आहे.

दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात उपलब्ध असणाऱ्या अत्याधुनिक संसाधनांनीयुक्त सुसज्जअशी प्रयोगशाळा, सुसज्ज असे ग्रंथालय व भरपूर संदर्भ साहित्य ई–साधने आणि 'डे टू डे अप्रोच' शिक्षण प्रणालीं असल्या मुळेच विद्यार्थ्यांनी सलग बारा वर्ष विद्यापीठस्तरीय निकालात आपले तसेच महाविद्यालयाचेही नावलौकिक केले आहे. तिच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन,कोषाध्यक्ष संजय बोरा व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी विद्यार्थिनीचे कौतुक करत अभिनंदन केले.

# बी.फार्म परीक्षेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीची विद्यार्थिनी सुप्रिया गुरमे विद्यापीठातून प्रथम

लातूर : स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा २०२१ च्या बी.फार्मसी परीक्षेच्या निकालात दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर च्या विद्यार्थ्यांनी प्रतिवर्षा प्रमाणे यशाची उज्वल परंपरा कायम राखत घवघवीत असे यश मिळविले आहे.या यशामुळे लातूरच्या शैक्षणीक क्षेत्रात दयानंद शिक्षण संस्थे ला मानाचा तुरा रोवला आहे

महाविद्यालयातील चतुर्थ वर्षाची विद्यार्थीनी कु. गुरमे सुप्रिया येलबा हीने अंतिम परिक्षेत



८६.३२% गुण मिळवून विद्यापीठातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला आहे. महाविद्यालयीन जीवनात सृजनशील विचारांना प्रोत्साहन देणारी,संकटाना समर्थपणे पेलण्याची कार्यक्षमता निर्माण करून देणारी तसेच विद्यार्थी जीवनाला सार्थकता प्राप्त करून देणारी संस्था आणि अभ्यासू व जिज्ञासू प्राध्यापक वर्ग व उपलब्ध सोई सुविधा यामुळेच आम्ही यशस्वी होऊ शकलो. याच महाविद्यालयात सुरु झालेल्या एम.फार्म फार्मासूटीक्स व फार्मासूटीकल क्वालिटी एशुरन्स या आभ्यासक्रमास निश्चित प्रवेश घेण्याची इच्छा व्यक्त करत आपले मनोगत यशस्वी विद्यार्थीनिने या प्रसंगी व्यक्त केले.या महाविद्यालयात उपलब्ध असणाऱ्या अत्याधुनिक संसाधनांनीयुक्त सुसज्जअशी प्रयोगशाळा,सुसज्ज असे ग्रंथालय व भरपूर संदर्भ साहित्य ई–साधने आणि डे टू डे अप्रोच शिक्षण प्रणालीं असल्या मुळेच विद्यार्थ्यांनी सलग बारा वर्ष विद्यापीठ स्तरीय निकालात आपले तसेच महाविद्यालयाचेही नावलौकिक केले आहे.तिच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन,कोषाध्यक्ष संजय बोरा व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी विद्यार्थिनीचे कौतुक करत अभिनंदन केले.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीत कोविड-१९ लसीकरण शिबिर

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** ■ येथील दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथे सामाजिक बांधिलकी व विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेता व महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार 'मिशन युवा स्वास्थ्य' मोहिम अंतर्गत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लातूर महानगरपालिका, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड-१९ लसीकरण शिबिर आयोजित केले होते.

राज्यातील महाविद्यालये सुरू झाली असल्याने युवकांचे लसीकरण होणे आवश्यक आहे. अनेक विद्यार्थ्यांचे कोरोना लसीकरण बाकी असल्यामुळे प्रत्यक्ष महाविद्यालयातील उपस्थितीला फटका बसत आहे. त्यामुळे युवकांचे लसीकरण केले जावे हा उद्देश लक्षात घेऊन महाविद्यालय परिसरातच विद्यार्थ्यांचे कोविड-१९ लसीकरण करण्यात आले. या लसीकरण उपक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते व रा.से.यो. विभागाचे प्रमुख प्रा. राहुल वाघमारे यांनी केले.

## महानगर पालिका व रासेयोचा संयुक्त उपक्रम



यावेळी दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूनम नत्थानी, डॉ. बांगाळे, डॉ. आयशा आवटे, डॉ. भास्कर बनाते, मीना तरपटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. काटेकर यांनी केले. या लसीकरण उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला. तसेच या उपक्रमात महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचाही सहभाग होता. या उपक्रमाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी कौतुक केले व पुढील काळात असेच कार्यक्रम राबवावेत त्या बद्दल शुभेच्छा दिल्या.

ePaper देशोन्नती
Sat, 30 October 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/64055124

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये कोविड-१९ लसीकरण शिबीर संपन्न



लातूर,दि.२९ : लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथे सामाजिक बांधिलकी व विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेता व महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सूचने नुसार मिशन युवा स्वास्थ्य मोहिमे अंतर्गत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लातूर शहर महानगरपालिका,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड-१९ लसीकरण शिबीर आयोजित केले होते.

राज्यातील महाविद्यालये सुरू झाली असल्याने युवकांचे लसीकरण होणे आवश्यक आहे. अनेक विद्यार्थ्यांचे कोरोना लसीकरण बाकी असल्यामुळे प्रत्यक्ष महाविद्यालयातील उपस्थितीला फटका बसत आहे. त्यामुळे युवकांचे लसीकरण केले जावे हा उद्देश लक्षात घेऊन महाविद्यालय परिसरातच विद्यार्थ्यांचे कोविड-१९ लसीकरण करण्यात आले. या लसीकरण उपक्रमा चे नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते व रा.से.यो.विभागाचे प्रमुख प्रा.राहुल वाघमारे यांनी केले.

यावेळी दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.पूनम नत्थानी,डॉ.बांगाळे, डॉ.आयशा आवटे, डॉ.भास्कर बनाते, श्रीमती मीना तरपटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. काटेकर यांनी केले या लसीकरण उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला. तसेच या उपक्रमात महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा ही सहभाग होता. या उपक्रमा बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी,सहसचिव सुरेश जैन,कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी कौतुक केले व पुढील काळात असेच कार्यक्रम राबवावेत त्या बद्दल शुभेच्छा दिल्या.

Smart Latur
Page No.2 November 28, 2021
पुण्य नगरी

# ‘दयानंद’मध्ये संविधान दिवस



**लातूर :** येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. भारतीय संविधानाविषयी प्रा. राहुल वाघमारे यांनी माहिती दिली. या प्रसंगी भारतीय संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन रासेयो विभाग प्रमुख प्रा. राहुल वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. प्रकाश शिवनेचारी यांनी आभार प्रदर्शन केले.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी टेबल टेनिस स्पर्धेत मारली बाजी

लातूर,दि.७ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व दयानंद कॉलेज ऑफ लॉ, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.७ डिसेंबर २०२१ रोजी अ विभाग आंतर महाविद्यालयीन मुलां मुलींच्या टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात होते. या स्पर्धे मध्ये विविध महाविद्यालयीन संघांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत मुलांच्या टेबल टेनिस संघाने रोमहर्षक विजय मिळवत प्रथम क्रमांक पटकावला विजयी संघात महाविद्यालयाचे कऱ्हाळे स्वप्नील,माने नारायण,शिंदे जतीन,विद्यार्थी सहभागी होते तर मुलींच्या टेबल टेनिस स्पर्धेत सहभागी वीर ऐश्र्वर्या,मुळी अंकिता,जोंधळे माधुरी, यांच्या संघाने विजय मिळवत दुसरा क्रमांक पटकावला. सर्व विजेत्या संघाचे प्रचार्या डॉ.क्रांती सातपुते यांच्या हस्ते पुष्प गुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. या प्रसंगी क्रीडा शिक्षक प्रा.ऋषी मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती.



या स्पर्धेतील विजेत्या संघाचे अभिनंदन करत दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी शुभेच्छा दिल्या.

Wednesday 2021/12/08 दैनिक आनंद नगरी

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांची टेबल टेनिस स्पर्धेत बाजी



**लातूर प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व दयानंद कॉलेज ऑफ लॉ, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अ' विभाग आंतर महाविद्यालयीन मुलां–मुलींच्या टेबल टेनिस स्पर्धेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारत रोमहर्षक विजय मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व दयानंद कॉलेज ऑफ लॉ, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. डिसेंबर रोजी 'अ' विभाग आंतर महाविद्यालयीन मुलां मुलींच्या टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात होते. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयीन संघांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत मुलांच्या टेबल टेनिस संघाने रोमहर्षक विजय मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांच्याविजयी संघात महाविद्यालयाचे स्वप्नील कऱ्हाळे, नारायण माने, जतीन शिंदे , विद्यार्थी सहभागी होते. तर मुलींच्या टेबल टेनिस स्पर्धेत सहभागी वीर ऐश्वर्या, अंकिता मुळी, माधुरी जोंधळे यांच्या संघाने विजय मिळवत दुसरा क्रमांक पटकावला. सर्व विजेत्या संघाचे प्रचार्या डॉ. क्रांती सातपुते यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. या प्रसंगी क्रीडा शिक्षक प्रा. ऋषी मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेतील विजेत्या संघाचे अभिनंदन करत दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी शुभेच्छा दिल्या.

ज

श्री. भरत सं. जगदाळे,

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीत आयोजित रक्तदान शिबिरात ५१ दात्यांनी केले रक्तदान

लातूर (प्रतिनिधी)- दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर येथे सामाजिक बांधिलकी व जाणीव लक्षात घेऊन रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात ५१ विद्यार्थी,विद्यार्थीनींनी व महाविद्यालयातीलशिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रम ुख अतिथी दयानंद विधी म हाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.



पूनम नत्थानी व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांच्या हस्ते फीत कापून झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे व भालचंद्र ब्लड बँकेच्या डॉ. शिवाजी सूर्यवंशी, सहकारी दिगंबर पवार, किशोर पवार आणि टीमचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. महाविद्यालया च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आल्या मुळे बी. फार्म तृतीय च्या मुलींनी भव्य अशी फार्मा रांगोळी काढली होती. कार्यक्रम ाचे सुत्रसंचालन वीर ऐश्वर्या तर आभारप्रदर्शन वैष्णवी शिंदे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात महाविद्यालयाचे रा.से.यो.विभाग प्रमुख प्रा.राहुल वाघमारे तसेच भालचंद्र ब्लड बँकेचे सहाय्यक रमाकांत सूर्यवंशी, किशोर कांबळे, इगवे मॅडम, पूजा शिंदे, संजय ठाकूर, अन्सार शेख व त्यांचे सहकारी. यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. महाविद्यालयातील डी. फार्म व बी. फार्मचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दयानंद फार्मसी येथे रक्तदान शिबीर संपन्न

लातूर : दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर येथे सामाजिक बांधिलकी व जाणीव लक्षात घेऊन रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या कार्याक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी दयानंद विधी महाविद्यालय,लातूर च्या प्राचार्या डॉ. पूनम नत्थानी व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांच्या हस्ते फीत कापून झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे व भालचंद्र ब्लड बँकेच्या डॉ.शिवाजी सूर्यवंशी,सहकारी दिगंबर पवार,किशोर पवार आणि टीम चे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

महाविद्यालया च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आल्या मुळे बी.फार्म तृतीय च्या मुलींनी भव्य अशी फार्मा रांगोळी काढली होती. रक्तदान शिबिरात ५१ विद्यार्थी, विद्यार्थीनींनी व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून उतस्फुर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वीर ऐश्र्वर्या तर आभारप्रदर्शन वैष्णवी शिंदे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात महाविद्यालयाचे रा.से.यो.विभाग प्रमुख प्रा.राहुल वाघमारे तसेच भालचंद्र ब्लड बँकेचे सहाय्यक रमाकांत सूर्यवंशी,किशोर कांबळे,इगवे मॅडम, पूजा शिंदे,संजय ठाकूर, अन्सार शेख व त्यांचे सहकारी. यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील डी.फार्म व बी.फार्म चे विद्यार्थी, विद्यार्थिनी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

मराठवाडा नेता

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीत क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन



लातूर, दि. ३१ :....

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३१ डिसेंबर २०२१ रोजी अ विभाग आंतरमहाविद्यालयीन मुलांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते स करण्यात आले यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य अजिंक्यजी सोनवणे व फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,विद्यापीठाचे बी.ओ.एस.मेंबर डॉ.भास्कर रेड्डी, डॉ.महेश बेंबडे, महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा.ऋषी मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेमध्ये विविध १३ महाविद्यालयीन संघानी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेतील प्रथम सामन्यात दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या संघाने विजय नोंदवून स्पर्धा शृंखलेचा प्रारंभ केला. या प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यपक वृन्द यांची उपस्थिती होती. या स्पर्धे तील सहभागी संघ व खेळाडूंना दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी शुभेच्छा दिल्या.

सकाळ



**लातूर : येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या हस्ते झाले. यावेळी रमेश बियाणी, अजिंक्य सोनवणे, भास्कर रेड्डी, महेश बेंबडे.**

# आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**लातूर** : नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने अ विभाग आंतर महाविद्यालयीन मुलांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन शुक्रवारी (ता. ३१) दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते झाले. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य अजिंक्य सोनवणे व फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते, विद्यापीठाचे डॉ. भास्कर रेड्डी, डॉ. महेश बेंबडे, महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा. ऋषी मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेमध्ये विविध १३ महाविद्यालयीन संघानी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेतील प्रथम सामन्यात दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या संघाने विजय नोंदवून स्पर्धा शृंखलेचा प्रारंभ केला.

Aurangabad, Latur-Today
01/01/2022 Page No. 3

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीत आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन संपन्न



लातूर, दि. ३१ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३१ डिसेंबर २०२१ रोजी अ विभाग आंतरमहाविद्यालयीन मुलांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते स करण्यात आले यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य अजिंक्यजी सोनवणे व फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते,विद्यापीठाचे बी.ओ.एस.मेंबर डॉ.भास्कर रेड्डी, डॉ.महेश बेंबडे, महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा.ऋषी मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेमध्ये विविध १३ महाविद्यालयीन संघानी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेतील प्रथम सामन्यात दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या संघाने विजय नोंदवून स्पर्धा शृंखलेचा प्रारंभ केला. या प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यपक वृन्द यांची उपस्थिती होती. या स्पर्धेतील सहभागी संघ व खेळाडूंना दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सहसचिव सुरेश जैन,कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी शुभेच्छा दिल्या.

सकाळ

# ‘यिन’च्या जिल्हाध्यक्षपदी चेतन घोडके

## लातूर शहराध्यक्षपदी ऐश्वर्या वीर यांची निवड

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver



लातूर : जिल्हाध्यक्ष चेतन घोडके यांचा सत्कार करताना दयानंद महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग.

**लातूर, ता. ४ :** ‘सकाळ’ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) जिल्हाध्यक्षपदी लातूरच्या दयानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी चेतन घोडके तर शहराध्यक्षपदी ऐश्वर्या वीर यांची निवड झाली.

जिल्ह्यातील महाविद्यालयांतून यिनचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची ऑनलाइन मतदानाद्वारे निवड झाली होती. यिनच्या महाविद्यालयीन निवडणुकीनंतर जिल्हाध्यक्ष कोण होणार? याची उत्सुकता महाविद्यालयांसह अध्यक्ष व मतदारांमध्ये होती. यानंतर शुक्रवारी (ता.३१) निवड प्रक्रिया झाली. लेखी परीक्षा परीक्षेच्या एकत्रित गुणांवर आधारित ही निवड प्रक्रिया झाली. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना यिनच्या मंत्रिमंडळात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या निवड प्रक्रियेसाठी परीक्षक म्हणून श्रीमती प्रा. सातपुते यांनी भूमिका पार पाडली.



“ **तरुणांसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचा मानस आहे. जिल्ह्यातील सर्व तरुणाईशी संवाद साधून विशेषतः ग्रामीण भागातील तरुणांना जागृत करून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील राहील.**

-**चेतन घोडके,** जिल्हाध्यक्ष, लातूर



“ **यिनने आम्हा तरुणांना सर्वांगीण विकासाची मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. यिनच्या माध्यमातून तरुणाईचे संघटन करून विधायक कार्य निर्माण करण्याचा संकल्प आहे.**

-**ऐश्वर्या वीर,** शहराध्यक्ष, लातूर

Aurangabad, Latur-Today
05/01/2022 Page No. 4

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी तर्फे खोपेगाव येथे ग्रामस्वच्छता अभियान



लातूर,दि.५ : दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर च्या रा. से. यो. विभागा तर्फे दि. १ जानेवारी २०२२ रोजी ग्राम स्वछता अभियाना अंतर्गत मौजे खोपेगाव येथे ग्राम स्वछता करण्यात आली.

या ग्राम स्वच्छतेचे आयोजन माहाविद्यालया तर्फे प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी केले तर कर्यक्रमाचे नियोजन रा.से.यो.विभाग प्रमुख प्रा.राहुल वाघमारे यांनी केले.या प्रसंगी सरपंच रवी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उपक्रमात रा. से. यो. वि. च्या ७४ विद्यार्थी, विद्यार्थिनींचा सहभाग होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा करेवाड तर आभार प्रदर्शन आकांक्षा वैद्य या विद्यार्थिनीने केले. हा उपक्रम यशस्वी करण्यात प्रा. रोहित येरटे व अजय मस्के यांचे सहकार्य लाभले.

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
06 Jan 2022

# खोपेगाव येथे ग्रामस्वछता अभियान

**लातूर :** दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूरच्या रा.से.यो.विभागा तर्फे ग्राम स्वछता अभियाना अंतर्गत खोपेगाव येथे ग्राम स्वछता करण्यात आली. या प्रसंगी प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, प्रा. राहुल वाघमारे, सरपंच रवी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुण्य नगरी 31-01-2022

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीत मराठी भाषा संवर्धनावर व्याख्यान

**लातूर :** येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये शनिवारी (दि.२९) मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त 'मराठी-भाषा आव्हाने व उपाययोजना' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान घेण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. शेटकार रामशेट्टी यांची उपस्थिती होती. या व्याख्यानाचे आयोजन प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते व प्रा. गोपाल लोहिया यांनी केले होते. मराठी भाषेचा आपल्याला अभिमान आहे. परंतु, हळूहळू मराठी भाषेचा ऱ्हास होत आहे. म्हणून मराठी भाषा संवर्धन करणे काळाची गरज आहे. मराठीने आपले स्थान पक्के केल्याशिवाय मराठीचे जागतिकीकरण होणार नाही. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात समाविष्ट केल्या गेलेल्या २२ भाषांपैकी मराठी ही महत्त्वाची भाषा आहे. अभिव्यक्ती विकासासाठी जितकी इंग्रजी ग्लोबल भाषा उपयुक्त आहे त्याच प्रमाणे महाराष्ट्रात जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी मराठी भाषेचा वापर करणे अत्यावश्यक आहे, असे प्रा. डॉ. शेटकार रामशेट्टी म्हणाले. सूत्रसंचालन प्रा. तृप्ती राजमान्य यांनी केले, तर आभार प्रा. नरेश हलके यांनी मानले. या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक व डी.बी. व एम. फार्मसीचे ३४३ विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते.

देशोन्नती माझं शहर लातूर, सोमवार, दि. ३१ जानेवारी २०२२



# 'मराठी भाषा आव्हाने व उपाययोजना' या विषयावर दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीत व्याख्यान

देशोन्नती वृत्तसंकलन...

लातूर - येथील दयानंद शिक्षण संस्था संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथे शनिवारी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त 'मराठी भाषा आव्हाने व उपाययोजना' या विषयावर माहिती मिळावी म्हणून ऑनलाईन व्याख्यान महाविद्यालयात आयोजीत करण्यात आले होते.



प्रमुख वक्ते म्हणून दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. शेटकार रामशेट्टी यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. रामशेट्टी म्हणाले, मराठी भाषेचा आपल्याला अभिमान आहे. परंतु, हळूहळू मराठी भाषेचा ह्रास होत आहे. त्याकरीता मराठी भाषा संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. ती आपण सर्वांनी पूर्ण केली पाहिजे. जागतिकीकरणात मराठीने आपले स्थान पक्के केल्याशिवाय मराठीचे जागतिकीकरण होणार नाही. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात समाविष्ट केल्या गेलेल्या २२ भाषांपैकी मराठी ही महत्त्वाची भाषा आहे. अभिव्यक्ती विकासाकरीता जितकी इंग्रजी सारखी ग्लोबल भाषा उपयुक्त आहे त्याच प्रमाणे महाराष्ट्रात जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी मराठी भाषेचा वापर करणे आज अत्यावश्यक आहे. या प्रमाणे आपले विचार व्यक्त करत मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कराव्या लागणाऱ्या उपायांची माहिती देवून पुढाकार घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

> मराठी भाषेचा आपल्याला अभिमान आहे. परंतु, हळूहळू मराठी भाषेचा ह्रास होत आहे. त्याकरीता मराठी भाषा संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. ती आपण सर्वांनी पूर्ण केली पाहिजे. जागतिकीकरणात मराठीने आपले स्थान पक्के केल्याशिवाय मराठीचे जागतिकीकरण होणार नाही.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, वेबिनार समन्वयक प्रा. गोपाल लोहिया यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान पार पडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तृप्ती राजमाने यांनी केले तर आभार प्रा. नरेश हलके यांनी मानले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित या व्याख्यानामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, डी. बी. व एम. फार्मसीचे ३४३ विद्यार्थी आणि विद्यार्थिनी ऑनलाईन उपस्थित होते.

मराठवाडा साथी

# क्रीडा विभाग प्रमुख प्रा.ऋषिकेश मस्के यांचा सत्कार



**लातूर (प्रतिनिधी-)**

शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांच्या हस्ते क्रीडा विभाग प्रमुख प्रा. ऋषिकेश मस्के यांचा सत्कार करण्यात आला.

(पान 7 वर...)

दैनिक
सकारात्मक विचारांचे
# आनंद नगरी
जालना, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, लातूर, बीड, नांदेड येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित होणारे मराठी दैनिक

Friday 2022/02/04

# विद्यापीठ परीक्षेत यशस्वी विद्यार्थिनीस दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे रोख बक्षीस वितरण




**लातूर (प्रतिनिधी)**–लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था लातूर संचालित, दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मधील विद्यापीठ टॉपर व विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव बक्षीस वितरण गुरूवारी संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते प्राध्यापक, यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ तर्फे घेण्यात आलेल्या बी. फार्म २०२०-२०२१ अंतिम वर्षाच्या परीक्षेत विद्यापीठातून प्रथम येणारी दयानंद महाविद्यालयातील विद्यार्थिनी गुरमे सुप्रिया हिचा १०,००० रुपयांचा धनादेश, भेटवस्तू व पुष्पवृक्ष देवून सत्कार करण्यात आला. तसेच राष्ट्रीय स्तरावरील ई-पोस्टर स्पर्धेत तृतीय पुरस्कार प्राप्त विद्यार्थिनी प्रज्ञा सगर, एम.ई.आर.सी.मुंबई तर्फे आयोजित प्रकाशन स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावल्या बद्दल पल्लवी सूर्यवंशी, पूजा सूर्यवंशी, प्रज्ञा सगर व विद्यापीठस्तरीय या विभागीय क्रीडा स्पर्धेत व्हॉलीबॉल-सुवर्ण पदक श्रद्धा देशमुख, टेबलटेनिस-रौप्य पदक वीर ऐश्वर्या, वेटलिफ्टिंग-रौप्य पदक आणि पॉवर-लिफ्टिंग-कांस्य पदक सूर्यवंशी कैलास, थाळीफेक आणि गोळाफेक-प्रथम मधुरा शेळके आणि राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावल्याबद्दल प्रा. अर्चना येलमटे या सर्वांचा भेटवस्तू व पुष्पवृक्ष देवून या प्रसंगी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी विद्यार्थ्यांच्या व प्राद्यापकांच्या या यशाबद्दल कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेशजी राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, सहाय्यक सचिव अॅड. श्रीकांत उटगे, कोषाध्यक्ष संजय बोरा, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते व सर्व प्राध्यापक वर्ग यांची प्रमुख उपस्थिती होती.

# विद्यापीठ परीक्षेत यशस्वी विद्यार्थिनीस दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे रोख बक्षीस वितरण

## सुप्रिया गुरमे हिला १० हजारांचा धनादेश व भेटवस्तू देऊन करण्यात आले कौतूक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** ▪ येथील दयानंद शिक्षण संस्था लातूर संचालित, दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी मधील विद्यापीठ टॉपर व विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव बक्षीस वितरण गुरुवारी संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते प्राध्यापक, यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या बी. फार्म २०२०-२०२१ अंतिम वर्षाच्या परीक्षेत विद्यापीठातून प्रथम येणारी दयानंद महाविद्यालयातील विद्यार्थिनी गुरमे सुप्रिया हिचा १० हजार रुपयांचा धनादेश, भेटवस्तू व पुष्पवृक्ष देवून सत्कार करण्यात आला. तसेच राष्ट्रीय स्तरावरील ई-पोस्टर स्पर्धेत तृतीय पुरस्कार प्राप्त विद्यार्थिनी प्रज्ञा सगर, एम.ई.आर.सी., मुंबई तर्फे आयोजित प्रकाशन स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावल्याबद्दल पल्लवी सूर्यवंशी, पूजा सूर्यवंशी, प्रज्ञा सगर व विद्यापीठस्तरीय या विभागीय क्रीडा स्पर्धेत व्हॉलीबॉल-सुवर्ण पदक श्रद्धा देशमुख, टेबलटेनिस- रौप्य पदक वीर ऐश्वर्या, वेटलिफ्टिंग-रौप्य पदक आणि पॉवर-लिफ्टिंग-कांस्य पदक सूर्यवंशी कैलास, थाळीफेक आणि गोळाफेक-प्रथम मधुरा शेळके आणि राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावल्याबद्दल प्रा. अर्चना येलमटे या सर्वांचा भेटवस्तू व पुष्पवृक्ष देवून या प्रसंगी सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लाहोटी यांनी विद्यार्थ्यांच्या व प्राध्यापकांच्या या यशाबद्दल कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, सहाय्यक सचिव ॲड. श्रीकांत उटगे, कोषाध्यक्ष संजय बोरा, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते व सर्व प्राध्यापक वर्ग यांची प्रमुख उपस्थिती होती.

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या बी. फार्म २०२०-२०२१ अंतिम वर्षाच्या परीक्षेत विद्यापीठातून प्रथम येणारी दयानंद महाविद्यालयातील विद्यार्थिनी गुरमे सुप्रिया हिचा १० हजार रुपयांचा धनादेश, भेटवस्तू व पुष्पवृक्ष देवून सत्कार करण्यात आला.

# पुस्तक हे शिक्षकाचे विद्यार्थ्यांसाठी स्थायी व चिरंतन योगदान-डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन



लातूर, दि. १२ : डॉ. क्रांती सातपुते व सहकार्यां द्वारा लिखित इन्सट्रूमेंटल मेथड्स ऑफ ऍनालिसिस (Instrumental methods of -nalysis) या पुस्तकाचा प्रकाशन सोहळास्वा.रा.ती.म .विद्यापीठ नांदेडचे प्र.कुलगुरू डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी सचिव रमेश बियाणी तसेच दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.साळुंके व दयानंद विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पूनम नथानी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या प्रसंगी पुस्तकाचे सहलेखक वैजिनाथ डिगे,तृप्ती राजमान्य,चंद्रवदन पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. पुस्तक प्रकाशन सोहळ्या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन यांनी प्राध्यापकांनी नेहमी विद्यार्थी अभिमुख शिक्षण दिले पाहिजे आणि त्यासाठी उत्तम दर्जाचे पुस्तक हे सर्वोत्तम परिणामकारक माध्यम असते असे सांगितले. या प्रसंगी त्यांनी दयानंद शिक्षण संस्थेचे कौतुक करत संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्या प्रेरणेतून संस्थेच्या व प्राध्यापकांच्या झालेल्या प्रगतीचे श्रेय दिले. संस्थेतील वातावरण हे विद्यार्थी तसेच प्राध्यापकवृंदांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यन्त पोषक असल्याचे मत हि त्यांनी व्यक्त केले.

फार्मसी अभ्यासक्रमां मध्ये अवघड समजल्या जाणाऱ्या विषयाची अत्यंत सोपी मांडणी या पुस्तकामध्ये केलेली आहे आणि सदरील पुस्तक हे बी.फार्म व एम.फार्म च्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असल्या चे मत या प्रसंगी डॉ. क्रांती सातपुते यांनी व्यक्त करत पुस्तकाचे महत्व विषद केले. त्यांनी या पुस्तकामागची आपली भूमिका स्पष्ट करताना उच्च दर्जाची अचूक माहिती,प्रगत तंत्रज्ञान व उद्योगाभिमुख शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हे या पुस्तकाचे उद्दीष्ट असल्याचे सांगितले.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी सर्व लेखकांचे अभिनंदन केले व सर्वांनी अशा प्रकारचे कार्य सुरुठेवत उत्तरोत्तर प्रगती साधावी असे सांगितले.पुस्तक प्रकाशना बद्दल लेखकांचे उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे,ललितकुमार शहा, श्री रमेश राठी,सहसचिव सुरेश जैन,कोषाध्यक्ष संजय बोरा आणि महाविद्यालयीन सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.

# पुस्तक हे शिक्षकाचे विद्यार्थ्यांसाठी स्थायी, चिरंतन योगदान : डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन



**लातूर / प्रतिनिधी**

डॉ. क्रांती सातपुते व सहकाऱ्यांद्वारा लिखित इन्स्ट्रूमेंटल मेथड्स ऑफ ऍनालिसिस या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेडचे प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी सचिव रमेश बियाणी तसेच दयानंद वाणिज्य म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साळुंके व दयानंद विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पूनम नथानी यांच्या प्रमुख उपस्थितीत पा पडला.

याप्रसंगी पुस्तकाचे सहलेखक वैजिनाथ डिगे, तृप्ती राजमान्य, चंद्रवदन पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. बिसेन यांनी प्राध्यापकांनी नेहमी विद्यार्थी अभिमुख शिक्षण दिले पाहिजे आणि त्यासाठी उत्तम दर्जाचे पुस्तक हे सर्वोत्तम परिणामकारक माध्यम असते, असे सांगितले. फार्मसी अभ्यासक्रमात अवघड समजल्या जाणाऱ्या विषयाची अत्यंत सोपी मांडणी या पुस्तकात केलेली आहे. हे पुस्तक हे बी.फार्म व एम.फार्मच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे मत डॉ. क्रांती सातपुते यांनी व्यक्त करत पुस्तकाचे महत्व विषद केले. त्यांनी या पुस्तकामागची भूमिका स्पष्ट करताना उच्च दर्जाची अचूक माहिती, प्रगत तंत्रज्ञान व उद्योगाभिमुख शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हे या पुस्तकाचे उद्दीष्ट असल्याचे सांगितले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी सर्व लेखकांचे अभिनंदन केले व सर्वांनी अशा प्रकारचे कार्य सुरु ठेवत उत्तरोत्तर प्रगती साधावी, असे सांगितले. पुस्तक प्रकाशनाबद्दल लेखकांचे उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा आणि महाविद्यालयीन सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

आज़ादी का अमृत महोत्सव

दैनिक राजधर्म

- Epaper.rajdharma.in
- वर्ष ४२ वे
- अंक १७
- किंमत : रु. २
- पृष्ठे : ६
- लातूर
- मंगळवार, दि.१५ फेब्रुवारी २०२२
- RNI NO : 39513/81

# पुस्तक हे शिक्षकाचे विद्यार्थ्यांसाठी स्थायी व चिरंतन योगदान-डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन



लातूर : डॉ. क्रांती सातपुते व सहकार्यां द्वारा लिखित इन्सट्रूमेंटल मेथड्स ऑफ ऍनालिसिस (Instrumental methods of Analysis) या पुस्तकाचा प्रकाशन सोहळास्वा.रा.ती.म .विद्यापीठ नांदेडचे प्र.कुलगुरू डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी सचिव रमेश बियाणी तसेच दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.साळुंके व दयानंद विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पूनम नथानी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या प्रसंगी पुस्तकाचे सहलेखक वैजिनाथ डिगे,तृप्ती राजमान्य,चंद्रवदन पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. पुस्तक प्रकाशन सोहळ्या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ.जोगेंदसिंह बिसेन यांनी प्राध्यापकांनी नेहमी विद्यार्थी अभिमुख शिक्षण दिले पाहिजे आणि त्यासाठी उत्तम दर्जाचे पुस्तक हे सर्वोत्तम परिणामकारक माध्यम असते असे सांगितले. या प्रसंगी त्यांनी दयानंद शिक्षण संस्थेचे कौतुक करत संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्या प्रेरणेतून संस्थेच्या व प्राध्यापकांच्या झालेल्या प्रगतीचे श्रेय दिले. संस्थेतील वातावरण हे विद्यार्थी तसेच प्राध्यापक वृंदांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यन्त पोषक असल्याचे मत हि त्यांनी व्यक्त केले.

फार्मसी अभ्यासक्रमां मध्ये अवघड समजल्या जाणाऱ्या विषयाची अत्यंत सोपी मांडणी या पुस्तकामध्ये केलेली आहे आणि सदरील पुस्तक हे बी.फार्म व एम.फार्म च्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असल्या चे मत या प्रसंगी डॉ. क्रांती सातपुते यांनी व्यक्त करत पुस्तकाचे महत्व विषद केले. त्यांनी या पुस्तकामागची आपली भूमिका स्पष्ट करताना उच्च दर्जाची अचूक माहिती,प्रगत तंत्रज्ञान व उद्योगाभिमुख शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हे या पुस्तकाचे उद्दीष्ट असल्याचे सांगितले.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी सर्व लेखकांचे अभिनंदन केले व सर्वांनी अशा प्रकारचे कार्य सुरुठेवत उत्तरोत्तर प्रगती साधावी असे सांगितले.पुस्तक प्रकाशना बद्दल लेखकांचे उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे,ललितकुमार शहा, श्री रमेश राठी,सहसचिव सुरेश जैन,कोषाध्यक्ष संजय बोरा आणि महाविद्यालयीन सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.

दैनिक
सकारात्मक विचारांचे
# आनंद नगरी
जालना, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, लातूर, बीड, नांदेड येथून एकाच वेळी सकाळमध्ये प्रकाशित होणारे मराठी दैनिक

Tuesday 2022/02/22

# छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म हाच पुरोगामी महाराष्ट्राचा जन्म-प्रा. येरटे



**लातूर (प्रतिनिधी)** –शिवाजी महाराजांचा जन्म हाच पुरोगामी महाराष्ट्राचा जन्म आहे व त्याला पुढे नेण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे असे प्रतिपादन प्रा. येरटे यांनी केले.लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे शनिवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी रा.से.यो. विभाग अंतर्गत शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सातपुते क्रांती यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून मानवंदना करण्यात आली. या प्रसंगी रा.से.यो. विभाग प्रमुख प्रा. राहुल वाघमारे यांच्यासह सर्व प्राध्यापक वृन्द व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक सकारात्मक विचारांचे
आनंद नगरी
जालना, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, लातूर, बीड, नांदेड येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित होणारे मराठी दैनिक
Saturday 2022/02/26

# संतुलित व पोषक आहार घेणे हा उत्तम आरोग्याचा मूलमंत्र-डॉ.आरती नाडापुडे

## दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीत परिसंवाद



**लातूर (प्रतिनिधी)**– संतुलित व पोषक आहार घेणे हा उत्तम आरोग्याचा मूलमंत्र असे मत डॉ. आरती नाडापुडे यांनी दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर येथे 'हील युअर बॉडी विथ गुड न्यूट्रीशियन' या विषयावर आयोजित परिसंवादात मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

महाविद्यालया तर्फे आयोजित या परिसंवादाचे आयोजन ईट राईट्स कॅम्पस अंतर्गत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, सह-संयोजक प्रा. कुलकर्णी योगेश व प्रा. सारडा रोहित यांनी केले. परिसंवादास प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून माधवबाग क्लिनिक लातूर च्या डायटिशियन व न्यूट्रीशियन तज्ञ डॉ. आरती नाडापुडे या उपस्थित होत्या. या परिसंवादास असिस्टंट फूड कमिशनर दयानंद पाटील यांचे हि खूप मोलाचे मार्गदर्शन लाभले.आझादी का अमृतमहोत्सव या सदरात घेण्यात येणाऱ्या विविध कर्यक्रमांपैकी हा एक होता. शारीरिक व मानसिक स्वास्थ चांगले रहावे या करीता संतुलीत आहाराचा आपण आपल्या जेवणात समावेश केलात तरच आपले शरीर निरोगी व धडधाकड राहू शकेल. सात्विक पोषक तत्त्वांचा आहारात सामावेश असणे गरजेचे असते. नियमित संतुलित आहार घेतल्यामुळे आजारपण येत नाही त्यामुळे आपल्या दैनंदिन आहारात संतुलित आहार कसा समाविष्ट करावा या बद्दल प्रभावी असे मार्गदर्शन प्रमुख पाहुण्यांनी केले. या परिसंवादास महाविद्यालयातील डी.,बी. व एम.फार्मसी चे विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच महाविद्यालयातील शिक्षकवृंद बहूसंख्येने उपस्थित होता.

देशोन्नती

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचे विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील 'गेट' परीक्षेत उत्तीर्ण

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** ■ आय. आय. टी. खरगपूरच्या वतीने अखिल भारतीय स्तरावर 'गेट' म्हणजेच ग्रॅज्युएट एप्टीट्यूड टेस्ट इन इंजिनीरिंग आणि विज्ञान शाखे अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या या परीक्षेत लातूर येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचे दोन विद्यार्थी 'गेट' परीक्षा उत्तीर्ण झाले महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाची नायगावकर मयुरी मधुकर, बी.फार्म तृतीय वर्षाचा कर्रेवार ज्ञानेश्वर राजकुमार यांनी यश मिळवले आहे.





महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गेट परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केले. या बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांच्यासह महाविद्यालयीन सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीचे विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील गेट परीक्षेत उत्तीर्ण

लातूर : आय आय टी खरगपूरच्या वतीने अखील भारतीय स्तरावर गेट म्हणजेच ग्रॅज्युएट एप्टीटय़ूड टेस्ट इन इंजिनीरिंग आणि विज्ञान शाखे अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या या परीक्षेत लातूर येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी चे दोन विद्यार्थी गेट परीक्षा उत्तीर्ण झाले महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाची



कु.नायगावकर मयुरी मधुकर, बी.फार्म तृतीय वर्षाचा कुर्रेवार ज्ञानेश्र्वर राजकुमार यांनी यश मिळवले आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गेट परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केले त्या बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांच्यासह महाविद्यालयीन सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

दैनिक सकारात्मक विचारांचे
आनंद नगरी
जालना, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, लातूर, बीड, नांदेड येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित होणारे मराठी दैनिक
Friday 2022/04/01

# दुध व अन्नातील भेसळ कशी ओळखावी?

## दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन




**लातूर (प्रतिनिधी)**–दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित,दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे अन्नातील भेसळ कशी ओळखावी यावर परिसंवाद आयोजित केला होता. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून फूड अँड ड्रग अॅडमिनिस्ट्रेशनचे असिस्टंट कमिशनर दयानंद पाटील व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

आझादी का अमृतमहोत्सव व ईट राईट कॅम्पस या सदरात घेण्यात येणाऱ्या विविध कर्यक्रमांपैकी हा एक होता. अन्नातील भेसळ ओळखायची कशी हा प्रश्न सर्वसामान्यांपुढे असतो. याबाबत माहिती व जनजागृती व्हावी या उद्देशाने हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.दुधात पाणी मिसळणे किंवा त्यातील चरबी काढून घेणे,शुध्द तुपात किंवा लोण्यात वनस्पती तूप मिसळणे,लोण्यात पाणी जास्त प्रमाणात ठेवणे (वजन वाढण्यासाठी), हळद पावडरीत एक विषारी पिवळा रंग मिसळणे, मिरची पावडरीत (लाल तिखट) लाकडाचा भुसा, विटांची पावडर किंवा इतर पावडर मिसळणे, हिंग खडयाबरोबर (किंवा खडयाच्या ऐवजी) इतर खडे विकले जातात.अशा विविध भेसळीच्या उदाहरणाचे विशलेषण प्रयोगासह येथे करण्यात आले.अन्नभेसळीचे दुष्परिणाम अनेक आहेत व रोज भेसळीचे अन्न पोटात जाऊन काही काळानंतर परिणाम दिसायला लागतात. काही वेळा मात्र ताबडतोब दुष्परिणाम दिसतात व मृत्यूही येऊ शकतो. अन्नभेसळीमुळे ब–याच लोकांना अपंगत्व आलेले आहे. तरीही भेसळ अखंडपणे चालूच आहे. भेसळीसंबंधी काही नेहमीची उदाहरणे आपण पाहिली. भेसळीची शंका आल्यास त्या भागातल्या अन्ननिरीक्षकाशी संपर्क साधावा किंवा राज्य सरकारच्या आरोग्य प्रयोगशाळांशी संपर्क साधावा असे मत भाषण करताना प्रमुख वक्त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमामध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकवृंद बहूसंख्येने उपस्थित होता.महाविद्यालयातर्फे या परिसंवादाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते, सह–संयोजक प्रा. रोहित सारडा व प्रा. राहुल वाघमारे यांनी केले.

# दूध व अन्नातील भेसळ कार्यशाळा संपन्न



लातूर दि.४ (प्रतिनिधी):- लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित,दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे अन्नातील भेसळ कशी ओळखावी यावर परिसंवाद आयोजित केला होता. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून फूड अँड ग एँडमिनिस्रेशन चे असिस्टंट कमिशनर दयानंद पाटील व त्यांचे सहकारी उपस्थित होते. आझादी का अमृतमहोत्सव व ईट राईट कॅम्पस या सदरात घेण्यात येणाऱ्या विविध कर्यक्रमांपैकी हा एक होता.अन्नातील भेसळ ओळखायची कशी हा प्रश्न सर्वसामान्यांपुढे असतो. याबाबत माहिती व जनजागृती व्हावी या उद्देशाने हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.दुधात पाणी मिसळणे किंवा त्यातील चरबी काढून घेणे,शुध्द तुपात किंवा लोण्यात वनस्पती तूप मिसळणे,लोण्यात पाणी जास्त प्रमाणात ठेवणे (वजन वाढण्यासाठी),हळद पावडरीत एक विषारी पिवळा रंग मिसळणे,मिरची पावडरीत (लाल तिखट) लाकडाचा भुसा, विटांची पावडर किंवा इतर पावडर मिसळणे.,हिंग खडयाबरोबर (किंवा खडयाच्या ऐवजी) इतर खडे विकले जातात.अशा विविध भेसळीच्या उदाहरणाचे विशलेषण प्रयोगासह येथे करण्यात आले.अन्नभेसळीचे दुष्परिणाम अनेक आहेत व रोज भेसळीचे अन्न पोटात जाऊन काही काळानंतर परिणाम दिसायला लागतात. काही वेळा मात्र ताबडतोब दुष्परिणाम दिसतात व मृत्यूही येऊ शकतो. अन्नभेसळीमुळे ब-याच लोकांना अपंगत्व आलेले आहे. तरीही भेसळ अखंडपणे चालूच आहे. भेसळीसंबंधी काही नेहमीची उदाहरणे आपण पाहिली. भेसळीची शंका आल्यास त्या भागातल्या अन्ननिरीक्षकाशी संपर्क साधावा किंवा राज्य सरकारच्या आरोग्य प्रयोगशाळांशी संपर्क साधावा असे मत दयानंद पाटील यांनी व्यक्त केले

या कार्यक्रमामध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकवृंद बहूसंख्येने उपस्थित होते महाविद्यालयातर्फे परिसंवादाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते सह-संयोजक प्रा.सारडा रोहित व प्रा. राहुल वाघमारे यांनी केले.

मराठवाडा नेता

# दयानंद शिक्षण संस्थेला फाईव्ह स्टार मानांकन

लातूर, दि. १७ :....
